Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# भारतीय राष्ट्रीय एकात्मता व धार्मिक संघर्ष



**सुनिल दामोधर भारोडकर**

संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

Email : sunilbharodkar88@gmail.com

**सारांश :** भारतीय राज्यघटना ही धर्मनिरपेक्ष आहे. प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते. मानवता हे मूल्य आपल्या राज्यघटनेमध्ये दिसते. परंतु दिवसेंदिवस ह्या मानवता या घटकाला तडे जाताना दिसतात. कारण देशामधील असलेली धार्मिक मूलतत्ववाद्यांनी मांडलेला धार्मिक संघर्ष त्याला कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे देशाची एकात्मता व मानवी एकात्मतेला तडा जात आहे. राजकीय पक्ष सुद्धा धर्म हा घटक त्यांच्या अजेंड्यावर आणून धार्मिक द्वेष पसरवण्याचे काम येथे करताना दिसतो. म्हणून धर्मनिरपेक्ष विचारसरणीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. सर्वधर्म समभाव ही वृत्ती जोपासने प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**शब्द :** भारतीय संविधान, धार्मिक मूलतत्ववाद, धार्मिक संघर्ष व धर्मनिरपेक्षता.

 All rights reserved.

## RESEARCH PAPER

प्रस्तावना :

राष्ट्रबांधणीची प्रक्रिया ही दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. स्वातंत्र्यपुर्व काळात ज्या राजकीय, सामाजिक सुधारना, उठाव, परिवर्तने घडून आली अशा सर्व घटकांचा समावेश राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेत करावा लागेल. या राष्ट्रबांधणीच्या कार्यातुनच स्वातंत्र्य राष्ट्रनिर्मितीचे ध्येय साकार झालेले असते. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेनंतर त्या राष्ट्राचे सार्वभौमत्व, राष्ट्राची एकता, राष्ट्राची संस्कृती त्या राष्ट्राची चांगली ओळख जागतीक पातळीवर, आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये होण्यासाठी त्या राष्ट्रातील राज्यकत्र्यांचे, नागरीकांचे ते प्रथम कर्तव्य आहे. एक सर्वांगीन राष्ट्र म्हणुन त्याच्या विकासासाठी भौगोलीक परिस्थिती, लोकसंख्या, सार्वभौमत्व व शासन व्यवस्था इ. घटकांची आवश्यकता असते. अखंडीत राष्ट्र व त्या राष्ट्राची एकात्मता व राष्ट्राबद्दलची आदरयुक्त भावना ही राष्ट्राची शक्ती होऊन जाते. अन्यथा राष्ट्राबद्दल निष्ठा व राष्ट्रामध्ये एकता नसेल तर त्या राष्ट्रामध्ये अराजकता निर्माण होऊन मानवी मुल्यांना तडा जाण्याची शक्यता असते.

भारताच्या संदर्भात राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ सर्वांना सामावुन घेणे. त्यामध्ये भाषा, वंश, जाती, वर्ग, धर्म, प्रदेश या सर्वांना एकत्र सामावुन घेणारी आणि या सर्व घटकांत एकात्मता निर्माण करणारी मुल्ये व व्यवहार यांची एकात्मता असे गृहीत धरले आहे.

परंतु भारतासारख्या लोकशाही समृद्ध राष्ट्राच्या एकात्मतेला व मानवतेच्या विकासाला बाधा आणणारी उपद्रवी घटक या राष्ट्रामध्ये पाहायला मिळतात, त्यापैकी मानवी मुल्यांना तडा देणारा, राष्ट्रीय एकात्मतेला, भारतीय संविधानाला आव्हान देणारा घटक वाढता धार्मिक मुलतत्ववाद म्हणजेच धार्मीक संघर्ष होय.

 *All rights reserved.*

## संशोधनाची उद्दिष्टे :

- भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष तत्त्वांचा अभ्यास करणे.
- भारतातील हिंसक धार्मीक घटना व संघर्षाचा आढावा घेणे.
- भारतातील राजकारण व धर्म यांचा अभ्यास करणे.

## ऐतिहासिक पाश्र्वभुमी :

स्वतंत्र्यपुर्व काळापासुन या देशात दोन धर्मामध्ये राष्ट्रीय ऐक्याचा प्रवाह निर्माण होऊ शकला नाही. या मागे काही राजकीय, सामाजिक कारणे असले तरी खNया अर्थाने धार्मिक कट्टरता वादी व त्यांची कर्मठ, ताठर भुमीकाच याला जबाबदार ठरली आहे. ब्रिटीशांच्या आगमनानंतर खNया अर्थाने हिंदु-मुस्लीम अलगतवादाचे अगदी बिजोरोपन झाले. मुस्लीम लिगची स्थापना झाली. महम्मंद अली जिना यांनी धर्माच्या आधारे राष्ट्रवादाची मांडणी करुन स्वातंत्र्य पाकिस्तानची मागणी केली होती. याला प्रतिक्रिया म्हणुन देशात हिंदुत्ववादी संघटनांचा उदय होऊन त्यांनी हिंदुराष्ट्रवादाची मागणी पुढे केली. हिंदु महासभा, जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनांनी हिंदु धर्मावर आधारीत पर्यायी राष्ट्राची मागणी करुन आपली मुलतत्ववादी विचार सरणी प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न केला, यातुनच सांप्रदायीक राजकारणाचा उदय होऊन देशात धर्माच्या नावावर सत्तेत येण्याचे मार्ग सुद्धा सुकर झाले. यातुनच धार्मीक संघर्षाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झालेली दिसते.

## धार्मिक मुलतत्त्ववाद :

सर्व साधारणपणे धर्माच्या संदर्भात ही मुलतत्ववादाची संकल्पना असल्यामुळे ती धार्मिक मुलतत्ववादी विचारसरणी म्हणुन परिचीत आहे. एकाच धर्माच्या सर्व लोकांमध्ये त्या धर्माच्या आधारे आत्मभान निर्माण करणे, आपली ओळख पटवुन देऊन त्यानुसार वागणे हे धार्मिक संप्रदायवादाचे प्रमुख लक्षण आहे. असे आत्मभान निर्माण करण्यासाठी स्वत:च्या धर्माविषयी

 All rights reserved.

अवास्तव अहंकार लोकांच्या मनात निर्माण जातो व त्याला पुरक म्हणुन इतर धर्म व धर्मीयांबद्दल संशय, तुच्छभाव व द्वेष पसरवीला जातो. आपले धार्मिक हित जोपासण्यासाठी प्रसंगी हिंसेचा वापर वेâला जातो. हिंसेचे समर्थन केले जाते. यातुनच धार्मिक दंगली पेटतात. मुलतत्ववाद म्हणजे मुळ धर्म ग्रंथात विंâवा लिखीत विचार जे त्या-त्या धर्मसंस्थापकांनी सांगुन लिहुन ठेवले आहे तेच खरे, चिरंतर, शाश्वत, अपरिवर्तनीय व प्रमाण असल्याचा आग्रह धरुन धर्मग्रंथातील संहितेतील अर्थ मनाप्रमाणे लावणारे व तोच खरा असल्याचे इतरांनी मान्य करावे असा हुकमी विचार की जो बुद्धिप्रामाण्यवाद विंâवा तर्कावर आधारीत विश्लेषण त्याला मान्य नसते.भारताच्या संदर्भात स्वातंत्र्योत्तर काळामध्ये या धार्मीक मूलतत्ववादी विचार सरणीचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात होऊन राजकारणामध्ये धर्माचा वापर मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसते. १९८५ ज्या सुप्रीम कोर्टाच्या (शहाबानु खटला) मोहम्मद अहमद खान विरुद्ध शाहबानु बेगम या खटल्यामध्ये सुप्रीम कोर्टाने दिलेला आदेश, तत्कालीन शासन, धर्मांध लोक व त्यानंतर राजकारणाला मिळालेली कलाटणी दिसते. यातुनच राजकारणामध्ये धर्माला स्थान येथे दिलेले दिसते. जात व धर्म ही राजकारणाची बलस्थाने बनुन भारतीय लोकशाहीला ती बाधक ठरलेले दिसतात.

## धार्मिक संघर्ष :

राजकीय सत्ता प्राप्तीसाठी राजकारणामध्ये वेळोवेळी धर्माचा आधार घेऊन राजकीय व्यक्ती सत्ता प्राप्त करतांना पाहायला मिळतात. भारतामध्ये स्वातंत्र्यपुर्वकालखंडामध्ये साम्राज्यवादी वृत्ती व स्वातंत्र्यानंतर हिंदु-मुस्लीमांचा धार्मिक संघर्ष, त्यातून द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत व त्यातुन घडलेल्या धार्मिक दंगलींमुळे मानवी मुल्यांचा Nहास झालेला दिसतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ऊसळलेल्या दंगली, त्यामधील जबलपुरा जमशेदपुर, राऊर केला मध्ये झालेले १९६२ मधील दंगे, बिहार, अहमदाबाद (१९६९), मुरादाबाद १९८०, नेली आसम १९८३, भिवंडी १९८४, मेरठ १९८७,

 All rights reserved.

रामजन्मभुमी (अयोध्या-बाबरी प्रश्न) १९८९ या सर्वांमध्ये हजारो लोकांची या दंगलीमध्ये हत्या झालेली दिसते. ऐंशीच्या दशकामध्ये हैद्राबाद, भागलपुर, अलीगढ तसेच आडवाणीच्या रथयात्रा व मुंबईतील दंगल, गुजरात मधील धार्मिक हिंसाचार अशा अनेक हिंसक घटनांमुळे भारतीय एकात्मतेला, मानवतेला धोका निर्माण झालेला दिसतो.

अलीकडच्या काळामध्ये धार्मिक संघर्ष वाढतांना सांप्रदायीक दंगे व त्यातुन होणारी मनुष्यहानी, आर्थिक हानी यामुळे जागतिक पटलावर भारताच्या प्रतिमेला धक्का बसला आहे.

**Communal Incidents person killed, injured therein during the Years - 2012,2013,2014,2015 January**

| Sr. No. | Year | Incidents | Killed | Injured |
|---|---|---|---|---|
| 1 | 2012 | 668 | 94 | 2117 |
| 2 | 2013 | 823 | 133 | 2269 |
| 3 | 2014 | 644 | 95 | 1921 |
| 4 | Jan. 2015 | 72 | 11 | 218 |

(Statement Referred to in Reply to Part (a to c)

Loksabha unstarred Question no. 2251-10/03/2015)

आकडेवारीमध्ये २०१३ या वर्षामध्ये हिंसक घटनांमध्ये वाढ झालेली दिसते कारण सोळाव्या लोकसभेच्या निवडणुकांचे राजकारण तेव्हा सुरु होते. निवडणुकांच्या वातावरण निर्मितीसाठी धार्मिक हिंसक घटना त्यामुळे घडवून आणलेल्या दिसतात. जानेवारी २०१५ मध्ये सांप्रदायिक घटनांमध्ये मोठी वाढ दिसते.

युएस कमीशन फॉर इंटरनेशनल रिलीजियस प्रिâडम (ळएण्घ्ERइ)२०१५ च्या रिपोर्टनुसार भारतात धार्मिक समुदायांच्या संदर्भात सार्वजनिक ठिकाणी धर्माच्या बाबतीत अपमानजनक वक्तव्य करणे व हिंसेची भाषा वापरून धार्मिक वातावरण दुषीत करण्याच्या घटनांमध्ये वाढ झालेली दिसते. तसेच कमिशनच्या रिपोर्ट नुसार २०१५ मध्ये अल्पसंख्यांक समुदाय विशेषत: इसाई, मुसलमान व शिख समुदायातील लोक या हिंसेमध्ये जास्त शिकार झाले आहे. जाने २०१५ मध्ये अमेरीकेचे

 *All rights reserved.*

राष्ट्रपती बराक ओबामा भारत दौNयावर आले असतांना सांप्रदायिक हिंसेचा मुद्दा उचलण्याची मागणी झाली होती. अमेरीकी रिपोर्टमध्ये भारतासंदर्भात धार्मिक स्वातंत्र्याबाबत नकारात्मक टिप्पणी झालेली होती. तसेच धार्मिक सहिष्णुतेची कमी व धार्मिक स्वातंत्र्य उल्लंघनाच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी झालेल्या दिसतात. त्यानंतर वैंâद्रीय गृहमंत्रालयाच्या अहवालानुसार वर्ष २०१५ मध्ये भारतात सांप्रदायिक हिंसेमध्ये १७ज्ञ् वाढझालेली आहे. (Nोे १८ हिंदी - भारत में बढे सांप्रदायिक हिंसा के मामले - अमेरीका रिपोर्ट)पोलीस आणि सुरक्षा दलांकडून मोठ्या प्रमाणात मानवी अधिकारांचे उल्लंघन झाले आहे. वर्ष २०१४ मध्ये वंâट्री रिपोटर्स ऑन ह्युमन राईटस प्रैक्टीसेज फार २०१४ च्या इंडिया सेक्शन नुसार भारतातील न्यायीक प्रक्रियेतील विलंब, बळजबरीने केलेली वैâद, विशिष्ट जाती धर्माच्या अत्याचारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असे दर्शवले आहे. महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, तामीळनाडू व इतर वरिष्ठ अधिकारी व आईबीच्या लोकांनी हे मान्य केले आहे की, मुसलमानांच्या प्रती पोलीस, सुरक्षाव्यवस्थेत पुर्वग्रह आहे. पोलीसांची धारणा सांप्रदायिक पक्षपाती व असंवेदनशील असते.

(Divya Himachal No.1 - Himachal News Hindi : News 1.1.17)

## भारतातील धर्म व लोकसंख्या :

भारतात अनेक जातीधर्माचे लोक राहतात.बहुसंख्यांक विरुद्ध अल्पसंख्यांक हा वाद नेहमी चर्चेला जातो. अल्पसंख्यांच्या हिताचे रक्षण करणे हे बहुसंख्यांकाचे कर्तव्य आहे. बहुदा तसे दिसत नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात येथे व्यक्तीहिताचे धोरणे ठरवल्या जातात. त्यासाठी धर्म व जातींची भुमीका ही पडद्यामागची असते. त्यामुळे भारतात धर्माच्या आधारे केलेली जनगणना महत्वाची ठरते.

 *All rights reserved.*

**Table Distribution of Population by religion (India)**

| Sr.No. | Religion | 2001 (%) | 2011 (%) |
|---|---|---|---|
| 1) | Hindus | 80.5 | 79.80% |
| 2) | Muslim | 13.4 | 14.23 |
| 3) | Christians | 2.3 | 2.30 |
| 4) | Sikhs | 1.9 | 1.72 |
| 5) | Buddhists | 0.8 | 0.70 |
| 6) | Jains | 0.4 | 0.37 |
| 7) | Others | 0.6 | 0.66 |
| 8) | Not stated | 0.1 | 0.24 |

Religion census - 2001, 2011 - Office of the Registrar General and Census Commissioner, India. (भारतातील जनगणना दर दहा वर्षांनी होते व ती वेंâद्रीय गृहमंत्रालय भारत सरकारच्या अखात्यारीत येते.)

वरील आकडेवारीमध्ये हिंदुच्या संख्येचे प्रमाण २००१ ते २०११ मध्ये कमी झालेले दिसते. तर मुस्लीम लोकसंख्या प्रमाण वाढते व बुद्धीस्ट लोकसंख्येमध्ये सुद्धा वाढ दिसते. एवंâदरीत वाढती लोकसंख्या ही एक समस्या दिसते. वाढत्या लोकसंख्येच्या गरजापुर्ण करणे शक्य नसते. हिंदु व मुस्लीम वाद हा काही वेळा लोकसंख्येवरुन होतांना दिसतो. त्यामुळे भितीचे वातावरण पसरविण्याचे काम काही धार्मिक मुलतत्त्ववादी संघटना करतांना दिसतात.

## भारतीय संविधान व धर्मनिरपेक्षता :

भारतीय संविधान एक उदार व मानवतेचा पुरस्कार करणारा कायदा आहे. मानवी मुल्यांच्या विकासासाठी विविधता असणाNया या देशात सर्वांना एकत्र बांधुन एकात्मतेचे दर्शन घडवणारे भारतीय संविधान आहे. १९५० मध्ये संविधान प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष शब्द नव्हता. १९७६ मध्ये ४२ व्या संविधान संशोधन कायद्याद्वारे तो भारतीय संविधानाच्या प्रस्तावणेमध्ये टाकण्यात आला. भारतातील धर्मनिरपेक्षता अशी व्यवस्था आहे की, ज्याद्वारे भारतातील धार्मिक आणि


*All rights reserved.*

सांस्कृतिक अनेकत्व एका ठिकाणी नांदते. धर्म निरपेक्षतेचा अर्थ म्हणजे सांप्रदायीकतेला विरोध व मानवतेचा पुरस्कार करणे म्हणजेच धर्मनिरपेक्षता होय. तेच भारतीय संविधानाचे खरे मुलतत्व आहे. (ए.पी.साठे सेक्युलीरीझम एंड सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया, दि लॉयर्स कलेक्टीव, आगस्ट १९९६).

भारतीय संविधानात मुलभुत अधिकारांमध्ये (अनुच्छेद १२ ते ३५) कलम २५-२८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार मान्य केला आहे. व्यक्तींना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. राज्यांनी सुद्धा धर्म-जातीच्या आधारावर भेदभाव न करता समानतेला मान्यता दिली पाहिजे असे सांगितले आहे. भारतीय राज्यघटनेचे स्वरुप पाहिले तर, ते धर्मनिरपेक्षच आहे कारण १) या राज्यघटनेत कोणताही विशिष्ट धर्म राज्यांचा राजधर्म म्हणुन मान्यता दिलेली नाही.सर्व धर्म समभावाचे तत्व येथे दिसते. २) सर्व धर्माच्या लोकांना आपल्या धर्माप्रमाणे प्रार्थना करण्याचा अधिकार संविधानामध्ये आहे. ३) कोणत्याही धर्माला उच्च-निच म्हणुन स्थान नाही. तसेच सरकारी अनुदानांवर धार्मिक शिक्षण देणे प्रतिबंद आहे.

## सारांश :

एवंâदरीत, भारतीय संविधान विशिष्ट कोणत्याही धर्माला बांधील नाही, विंâवा विशिष्ट धर्माला प्रोत्साहन देत नाही. शिवाय धर्मनिरपेक्ष देशाला ते करण्यास भाग पाडत नाही. व्यक्तीला व समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते, व्यक्तीला नागरीक म्हणुन वागवणुक देते व धर्म, जात यांच्याकडे न पाहता मानव म्हणुन पाहते ते धर्मनिरपेक्ष राज्य होय,हेच भारतीय संविधानाला अपेक्षीत आहे. प्रत्येक समुदायाने आपल्या स्वधर्माबद्दल अभिमान बाळगतांना पर धर्माचा द्वेष तथा विरोध करण्यास सुरुवात केली की त्याचे परिणाम संपुर्ण देशाला भोगावे लागतात. देशाची शांतता भंग होऊन देशाचे नुकसान होते. त्यामुळे धार्मिक सद्भावना, बंधुतेची, एकात्मतेची भावना एकमेकांच्या धर्माबद्दल आदर वाढीस लागणे देशासाठी महत्त्वाचे आहे. भारतातील नागरीकांना

 *All rights reserved.*

त्यांच्या धर्माचा कायदा व देशाचा धर्मनिरपेक्ष कायदा अशा विषम परिस्थितीमध्ये जगतांना देशाच्या विकासाला बाधा होण्याची शक्यता असते. ही विषमता दुर करण्यासाठी सर्वांना समतेचा समान नागरी कायदा मान्य करावा लागेल जो भारतीय संविधानामध्ये आहे की ज्यामुळे धार्मिक कलह थांबु शकतो.

## निष्कर्ष :

- भारतीय राज्यघटना ही धर्मनिरपेक्ष राज्याला प्रोत्साहन देते. भारतातील धार्मिक संघर्षामध्ये स्वातंत्र्योत्तर काळानंतर वाढ झालेली दिसते.
- आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतासंदर्भात देशात घडणाNया धार्मिक घटनांवर नकारात्मक मत तयार झाले आहे.
- धर्म व जातीवर आधारीत राजकारण भारतामध्ये पाहायला मिळते.
- धार्मिक संघर्षामध्ये निरअपराध व सर्वसामान्य नागरीकच जास्त मृत्यूमुखी पडतात.

 All rights reserved.

## संदर्भ


पुनिमानी राम, सांप्रदायिक राजनीती : तथ्य एवं मिथक वाणि प्रकाशन, दिल्ली, प्रथमावृत्ती, २००५.

राम पुनियानी - बुरख्याआडचे चेहरे, धर्मनिरपेक्ष लोकशाही की हिंदु राष्ट्र, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५.

गर्गे, स.मा., भारतीय समाजविज्ञान कोष, मेहता पब्लिकेशन, पुणे.

कसबे रावसाहेब, हिंदु-मुस्लीम प्रश्न व सावरकरांचा हिंदु राष्ट्रवाद, सुगावा प्रकाशन, पुणे.

पळशीकर सुहास, समकालीन भारतीय राजकारण काँग्रेस वर्चस्व ते हिंदु जमातवाद - प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.

रिपोटर्सकमीशन फॉर इंटरनेशनल रिलीजियस फॉर प्रâीडम(ळएण्घ्ERइ)

भारतीय जनगणना अहवाल, २००१, २०११

Office of the Registrar General and Census Commissioner, India.

www.loksabha (unstarred question no.2251)

Indian constitution - Justice and Laws Department, Govt. of India.

Daily News paper - Indian Express, Times of India, Lokmat.

समाज प्रबोधन पत्रिका


 *All rights reserved.*